लोकमत

## शिवाजी विद्यापीठाने घेतली गंभीर दखल : चौकशीची संघटनांकडून मागणी

# 'बीपीएड' पदवीप्रकरणी पोलिसांकडे तक्रार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : बीपीएडची पदवी ६० हजार, तर एमपीएडची पदवी ७५ हजार रुपयांत उपलब्ध असून संपर्क साधण्याचे नांदेडमधील असल्याचे सांगणाऱ्या एका युवकाने चक्क फेसबुकवर पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या नावाचा उल्लेख आहे. त्याची विद्यापीठ प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन गुरुवारी राजारामपुरी आणि सायबर पोलीस ठाण्यात पत्राद्वारे तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, या प्रकरणाची चौकशी करण्याच्या मागणीचे निवेदन विविध संघटनांनी विद्यापीठ प्रशासनाला दिले.

या पोस्टची माहिती 'लोकमत'ने बुधवारी (दि. १२) विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांना दिली.

त्यांनी या संदेशातील क्रमांकावर संपर्क साधून काही माहिती घेतली आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने गुरुवारी दक्षता म्हणून आणि या संदेशाच्या अनुषंगाने अधिक चौकशी व्हावी यासाठी राजारामपुरी आणि सायबर पोलीस ठाण्यात डॉ. नांदवडेकर यांनी तक्रार दाखल केली. विद्यापीठाच्या नावाचा गैरवापर केल्याबद्दल पोस्ट करणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी या तक्रारींच्या माध्यमातून त्यांनी केली आहे.

दरम्यान, आणखी काही घटना उघडकीस येण्यासाठी या बनावट डिग्री प्रकरणाच्या तपासासाठी विद्यापीठाने 'सीआयडी'कडे तक्रार दाखल करावी, अशी मागणी शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे संस्थापक-अध्यक्ष वसंतराव मगदूम यांनी केली. विद्यापीठाचे नाव वापरुन पदव्या देण्याबाबत फेसबुकद्वारे आवाहन करणाऱ्या युवकास कठोर शासन होण्यासाठी विद्यापीठाने पावले उचलावीत.

त्याच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी विद्यापीठ शिक्षक संघाच्या वतीने कोल्हापूर जिल्हा कार्यवाह डॉ. सुभाष जाधव यांनी केली. सध्या कोरोना काळातील अडचणीच्या परिस्थितीचा अनेक लोक गैरफायदा घेताना दिसत आहेत. त्यामुळे विद्यापीठाने वेळीच सावध व्हावे. सखोल चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनचे गिरीश फोंडे, प्रशांत आंबी, हरीश कांबळे यांनी केली.

> बीपीएड, एमपीएड या अभ्यासक्रमांचे पदवी प्रमाणपत्र काही रक्कम आकारुन देत असल्याची पोस्ट इलेक्ट्रॉनिक समाजमाध्यमांतून देऊन शिवाजी विद्यापीठाच्या नावाचा त्यात गैरवापर केल्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाने राजारामपुरी पोलीस ठाण्यासह सायबर सेलकडे तक्रार दाखल केली आहे. विद्यार्थी, पालकांनी अशा प्रकारच्या समाजमाध्यमांवरील कोणत्याही पोस्टला बळी पडू नये.
>
> \- डॉ. विलास नांदवडेकर,
> कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

# विद्यार्थी मंडळ निवडणुकांनाही ब्रेक!

## विद्यापीठ प्रशासनाची शासनाकडे मार्गदर्शनाची मागणी : सलग तिसऱ्या वर्षी 'खो'

**कोल्हापूर : सचिन टिपकुर्ले**

महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण तयार व्हावेत म्हणून महाविद्यालय व विद्यापीठस्तरावर विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका घेण्यात येत होत्या; पण नैसर्गिक आपत्ती तसेच कोरोनामुळे यावर्षीही विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका रद्द होण्याची शक्यता आहे.

विद्यापीठ प्रशासनाने याबाबत राज्य शासनाला निवडणूक रद्द करण्याबाबत मार्गदर्शन करावे, असे विचारणा करणारे पत्र पाठवले आहे. आज राजकारणातील अनेक यशस्वी नेत्यांनी विद्यार्थी मंडळाच्या निवडणुकीतूनच राजकारणाचा श्रीगणेशा केला आहे. त्यामुळे नव्या तरुणांना राजकारणात आणण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून या निवडणुकांकडे पाहिले जात होते. मध्यंतरी त्यातून वाद, हाणामारी असे प्रकार घडल्याने विद्यार्थ्यांची गुणवत्तेवर निवड केली जाऊ लागली. त्यामुळे जाहीर निवडणूक प्रक्रिया रद्द करण्यात आली; पण २०१८ मध्ये पुन्हा निवडणुका घेण्याचा निर्णय झाला.

वास्तविक पाहता शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर दि. ३१ जुलैपर्यंत निवडणूक नोटिफिकेशन काढून दि. ३० सप्टेंबरपर्यंत निवडणूक घेणे कायद्यानुसार बंधनकारक असते; पण मार्च २०२० पासून कोरोनामुळे लॉकडाऊन करण्यात आले. दहावी-बारावीचे



निकाल जाहीर झाले; पण पुढच्या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू नाही. ऑगस्ट महिना उजाडला तरी महाविद्यालये विद्यापीठ बंद आहेत. त्यामुळे दि. ३१ जुलैपर्यंत नोटिफिकेशन काढता आलेले नाहीत. निवडणूक प्रक्रियाच होणार नसल्याने निवडणुका रद्दबाबत शासनाने आदेश काढण्याची मागणी विद्यापीठाने केली आहे.

> केवळ राजकारणच नाही तर स्वत: निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करणे हा यामागचा हेतू आहे. पण नैसर्गिक आपत्ती, कोरोनामुळे यावेळी निवडणुका घेणे शक्य नाही. याबाबत राज्य शासनाला कळवले आहे.
>
> **प्रा. डॉ. आर.जी.गुरव**
> विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक

यावर्षी निवडणूक बऱ्यापैकी रद्दच झाल्याने शिवाजी विद्यापीठ इतिहासात विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका सलग तीन वर्ष रद्द होण्याची पहिलीच घटना आहे. २०१८ साली गुणवत्तेनुसार निवडणुका न होता मतदान करूनच निवडणुका घ्याव्यात, असे आदेश काढले; पण हा आदेश २६ ऑक्टोबर २०१८ लागू झाला. ३१ जुलैनंतर हे आदेश आल्याने तेव्हा निवडणुका रद्द करण्यात आल्या. गेल्यावर्षी महापूर व विधानसभा निवडणुकांमुळे विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. आता कोरोनामुळे अद्याप महाविद्यालये बंद असल्याने विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका रद्द झाल्या आहेत. त्यामुळे सलग तीन वर्षे निवडणूक रद्द होण्याची ही पहिलीच घटना आहे.

# शिवाजी विद्यापीठाची पोलिसांत तक्रार

## बनावट पदवी प्रकरण; सायबर सेलकडे तपास, संघटनांची निवेदने

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : बीएड आणि एमएडची पदवी ६० हजार रुपयांमध्ये मिळेल, अशी पोस्ट सोशल मीडियावरून व्हायरल झाली होती. याची खात्री केल्यानंतर आज विद्यापीठ प्रशासनाने पोलिसांत तक्रार दिली आहे. याचा तपास सायबर सेल करणार असून, अशाप्रकारच्या कोणत्याही संदेशावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

बीएड आणि एमएडची पदवी ६० हजारांत मिळेल, अशी पोस्ट सोशल मीडियावरून चार दिवसांपासून व्हायरल झाली होती. या पोस्टची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांना मिळाली. त्यांनी पोस्टमध्ये दिलेल्या क्रमांकावर फोन केला. त्यावरून पोस्ट टाकणारी व्यक्ती नांदेडची असून, त्या व्यक्तीने विद्यापीठाची बनवाट डिग्री देत असल्याचे मान्य केले. तसेच भविष्यात काही अडचण आल्यास मी जबाबदार नाही, असेही सांगितले. या पोस्टमुळे विद्यापीठात खळबळ उडाली. प्रभारी परीक्षा नियंत्रकांनी अशा कोणत्याही पोस्टवर विश्वास ठेवू नका, असे आवाहनही केले. दरम्यान, आज विविध संघटना, संस्थांनी विद्यापीठ प्रशासनाकडे याबाबत पोलिस तक्रार द्यावी, असे निवेदन दिले. दुपारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पोलिसांत फिर्याद दिली. सायबर पोलिस याबाबतचा तपास करणार आहेत.

> शिवाजी विद्यापीठासह अन्य विद्यापीठाची बनावट डिग्री मिळेल या आशयाचा संदेश सोशल मीडियावर फिरत होता. विद्यापीठ प्रशासनाने संदेशाची खात्री केली. या पोस्टमध्ये अज्ञात व्यक्तीचा हात असल्याचे समोर आले. आज याबाबत प्रशासनाने पोलिसांत तक्रार दिली आहे. पोस्टच्या अनुषंगाने या व्यक्तीशी कोणीही कोणताही व्यवहार करू नये. या पोस्टवर विश्वास ठेऊ नये.
>
> - डॉ. विलास नांदवडेकर (कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)

### मोठ्या रॅकेटची शक्यता

विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांनी पोस्टमधील क्रमांकावर फोन केला. यावेळी शिवाजी विद्यापीठाबरोबरच दुसऱ्या विद्यापीठांच्याही पदवी देऊ शकतो, असे त्या व्यक्तीने सांगितले. त्यामुळे या व्यक्तीने बऱ्याच जणांना बनावट पदवी दिल्याची शक्यता आहे. तसेच यामागे मोठे रॅकेट कार्यरत असू शकते.

